नि.फौ.ख.क्र. २९/२०१८
(नि. १०)
CNR: MHSI05-000163-2018

**फिर्यादीतर्फे दोषारोपपूर्वीचा पुरावा साक्षीदार क्र. १ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव– रश्मी तारककुमार मठकर,
वय सुमारे ५४ वर्षे, व्यवसाय – नायब तहसिलदार,
निवासस्थान– तहसिलदार कार्यालय वेंगुर्ला, ता. वेंगुर्ला, जिल्हा – सिंधुदूर्ग.

**सरतपास अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. सावंत.**

१. मी दिनांक २७/११/२०१७ पासून वेंगुर्ला येथे महसुल नायब तहसिलदार म्हणून कार्यरत आहे. वेंगुर्ल्यातील काही भागांना समुद्र किनारपट्टी असल्यामुळे केंद्रीय पर्यावरण संरक्षण कायद्यातील नियमावली लागू आहे. १९९१ मध्ये सी.आर.झेड. बाबत पहिली अधिसुचना समुद्र किना–यास लागू झालेली आहे. सन २०११ मध्ये त्याबाबत नवीन नियम लागू करण्यात आले. २०११ च्या नियमाप्रमाणे उच्चतम भरती रेषा ५०० मिटर इतकी ठरविण्यात आली होती. त्याच्या बाहेर बांधकाम करणे अपेक्षित आहे. खाडी किना–यापासून २०० मीटरच्या बाहेर बांधकाम करणे अपेक्षित आहे.

२. आरोपी सिध्दार्थवाडी येथील रहाणारे आहेत. सर्व्हे नं. २ हिस्सा नं. १/१ब मध्ये त्यांचे बांधकाम आहे. त्यामध्ये त्याने सन २०११ मध्ये अनाधिकृत बांधकाम केलेले आहे. त्याकरीता त्यांनी महसुल खात्याचे आणि स्थानिक ग्रामपंचायतीचे आणि महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथोरिटी यांची रितसर परवानगी घेतलेली नाही. यामुळे सी.आर. झेडच्या तरतुदींचा भंग झाला आहे. त्यामुळे तलाठी आणि मंडळ अधिकारी यांनी तहसिलदार यांचेकडे रिपोर्ट केला होता. त्या रिपोर्टवरुन अस दिसले की अनाधिकृत बांधकामामुळे आरोपी यांना नोटीस देण्यात आली होती व ज्या कागदांपत्रांच्या आधारे ते बांधकाम करत आहेत ते परवानगीचे अगर संबंधित खात्याचे कागदपत्र सादर करण्यास सांगण्यात आले होते. आरोपीने कोणतेही कागदपत्र दाखविले नसल्याने व आरोपीचे बांधकाम अनाधिकृत असल्यमुळे सदर बांधकाम पाडून टाकण्यासाठी आदेश होण्यासाठी उपविभागीय अधिकारी सावंतवाडी यांच्याकडे अहवाल पाठविला. तो अहवाल याकामी दाखल करण्यात आला आहे. त्याप्रमाणे दिनांक २३/११/२०१६ रोजी त्यांनी बांधकाम पाडणेबाबत फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत आदेश केला.

त्यानंतर दिनांक २५/९/२०१७ रोजी आदेश महसुल नायब तहसिलदार यांना प्राधिकृत केले. त्यानंतर तहसिलदार वेंगुर्ला यांनी दिनांक ३०/१२/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यासाठी नाव व पदनाम याने गुन्हा दाखल करण्यासाठी प्राधिकृत केले. आता मला दाखविण्यात आलेला आदेश तोच असून तो मी आता सांगितल्याप्रमाणे तहसिलदार यांनी मला दिलेला आहे. सदर दस्तऐवज वर तहसिलदार यांची सही देखील आहे. ती मी ओळखते. (**सदर आदेशाला निशाण ११ देण्यात आले.**) या आदेशाप्रमाणे मी या न्यायालयात आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली. मी माझी तक्रार ज्या कागदपत्रावर आधारीत आहेत ते कागदपत्र मी माझे तक्रारीसोबत दाखल केलेले आहेत. आरोपीने जे अनाधिकृत बांधकाम केलेले आहे ते कोणत्याही खात्याची परवानगी न घेतला केलेली आहे. तसेच त्यामध्ये सी.आर.झेड.च्या तरतुदींचा भंग होणारा असून त्यामुळे त्यांचेवर योग्यती कारवाई करण्यात यावी.

**आरोपीतर्फे वकिलांनी उलटतपास दोषारोपपर्यंत राखीव ठेवण्यात यावा असे त्याने सांगितले. सबब उलटतपास तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/—

**दिनांक :—२०/०२/२०१९.** **न्यायदंडाधिकारी वर्ग १ वेंगुर्ला.**